फिलोमिना नलावडे पु.श्र. फिलोमिना परेरा वि.
मनवेल अंतोन परेरा व.

## निशाणी क्रमांक १०३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांनी त्यांच्याविरुध्द पारीत झालेला 'एकतर्फा आदेश' रद्द होऊन मिळण्याकरीता केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांच्या मते, सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द धडेवाटप होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर दाव्याची समन्स बजावणी होऊन देखील प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ हे मे.कोर्टात हजर न राहिल्याने मे. कोर्टाने त्यांचेविरुध्द निशाणी क्र.१ वर दि.२१.११.२०२५ रोजी एकतर्फा आदेश पारीत केलेला आहे. परंतु, प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ हे वयोमानामुळे आजारी असल्यामुळेते हिंडू-फिरू शकत नाहीत. म्हणून त्यांना मुदतीमध्ये मे.न्यायालयामध्ये उपस्थित राहता आलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांनी त्यांच्याविरुध्द पारीत केलेला एकतर्फा आदेश रद्द करणेची विनंती केलेली आहे.

३. वादी यांनी निशाणी क्र.११२ वर म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांचे अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांनी विलंबाचे कोणतेही संयुक्तीक कारण व त्याबाबतचा कोणताही पुरावा दिलेले नाही. सदरचा अर्ज कायद्याने चालणारा नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा अर्ज खर्चासहित नामंजुर करणेत यावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे. .

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

५. प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांच्याविरूध्द झालेला एकतर्फा असा आदेश रद्द व्हावा अशी विनंती केलेली आहे. प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ समन्स बजावणीवेळी ते वयोमानामुळे आजारी असल्यामुळे हिंडू-फिरू शकत नसल्याकारणांमुळे न्यायालयात हजर राहू शकले नाहीत, असे कथन केलेले आहे. प्रतिवादी क्र.२८ यांनी आपल्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. प्रस्तुतचा दावा हा कायम धडेवाटप होवून मिळणेकरीता दाखल केला

असल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणामध्ये झालेला विलंब व त्या अनुषंगाने वादीची झालेली गैरसोय योग्य त्या खर्चाद्वारे भरणे गरजेचे आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरिता प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना संधी दिल्यास ते न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांचेविरुध्द एकतर्फा आदेश रद्द झालेस वादीचे प्रस्तुतच्या दाव्याकामी कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रस्तुतचा नि.१०३ कडील अर्ज प्रत्येकी रक्कम रु.२००/- (रु.दोनशे मात्र) इतक्या खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांचे विरूध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांनी खर्चाची रक्कम वादीला पुढील तारखेस वा तत्पूर्वी देणेची आहे.

४. प्रतिवादी क्र.२, ६, ७ व २८ यांनी पुढील तारखेस खर्चाची रक्कम देण्यास कसूर केलेस प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

५. उभय पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

सही/-

दिनांकः- १६/०७/२०२६ ( एन.ए.बकरे )

ठिकाणः- कुडाळ सह दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर), कुडाळ